

# अंर्तमनाचा शोध घेणारा कलाविष्कार

कसलंही शिक्षण-प्रशिक्षण न घेता स्वत:ला घडवणाऱ्या व्यक्ती फार क्वचितच अनुभवायला मिळतात. काही मिळालं नाही म्हणून आम्ही आयुष्यभर कुरकुर करत बसतो. पण आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार असतो हे आपल्याला माहीतच नसतं. आपल्या आवडीच्या क्षेत्राचा वेध प्रत्येकालाच घेता येतो, असं नाही. ज्यांनी घेतला त्यांनी आपल्या जीवनाचं सार्थक केलं. असंच एक व्यक्तिमत्त्व. प्रकाश बाळ जोशी. एक भारदस्त व्यक्तिमत्त्व. कुठलाही अहंपणा नाही. इगतपुरीहून सुरू झालेला यांचा कलाप्रवास मुंबापुरीत स्थिरावतो खरा; पण जगाच्या पाठीवरही तो सुरुच आहे. जोशी सरांनी जे पाहिलं, ताडलं, अनुभवलं ते कॅनव्हासवर मांडलं, बस्स..! यासाठी अनेकांना मार्गदर्शकाची गरज असते. पण जोशी सरांनी मात्र ते सहज आत्मसात केलं. कसं ते जाणून घेऊया त्यांच्याच शब्दात...

प्रकाश बाळ जोशी यांचं बालपण निसर्गरम्य इगतपुरी येथे गेलं. इगतपुरी येथील महात्मा गांधी हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केलं. चित्रकलेची आवड शाळेपासूनच होती. पण करिअर म्हणून त्यांनी या विषयाकडे कधीच पाहिलं नाही. याउलट पुढे पुण्यातील रानडे इन्स्टिट्यूटमधून केमिस्ट्री या विषयात त्यांनी पदवी संपादन केली. आश्चर्य म्हणजे लिखाणाची आवड होती, म्हणून त्यांनी जर्नालिझमचं प्रशिक्षणही घेतलं. पुढे करिअर म्हणून पत्रकारिता केली. 'टाइम्स ऑफ इंडिया', 'इंडियन एक्स्प्रेस' या इंग्रजी वर्तमानपत्रांत राजकीय आणि सामाजिक विषयांवर लिखाण केले. हे सगळं करत असताना चित्रकला ही सुरूच होती. जे शब्दात मांडता येत नव्हतं, ते अनेकवेळा अमूर्त चित्रांमधून ते कॅनव्हासवर उतरवत असत. हे करत असतानाच कॅनव्हास किंवा रंगांचा वापर कसा, कुठे आणि किती करावा याची माहिती मिळत गेली. जोशी सर सांगतात, ''१९७६ मध्ये मुंबईत आलो. यशवंत चौधरी जे ग्राफिक डिझायनर होते ते माझे मित्र होते. त्यांना मी काढलेली स्केचेस आवडली. तू चित्र काढत राहा, म्हणून त्यांनी मला उत्स्फूर्त केलं. पण मी दुर्लक्ष केलं. काही दिवसांनी त्यांनी माझी ओळख प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट ग्रुपचे सदस्य चित्रकार के.एच. आरा. यांच्याशी करून दिली. तुमची चित्रकला विकसित करायची असेल तर तुम्हाला कोणत्याही प्रशिक्षणाची गरज नाही. त्यांची आणि माझी मतं जुळणारी होती. एखादी इन्स्टिट्यूट आपल्याला घडवू शकते, हे डोक्यातून काढून टाकलं. पंधरा दिवसांतून एकदा जहाँगीर आर्ट गॅलरीत जाऊन बसायचे. जे वाटत होतं, पाहात होतो ते चित्रांमधून मांडत गेलो. ते पाहणाऱ्याला आवडत गेलं.'' प्रशिक्षणातही काही गोष्टी शिकवल्या जात नसाव्यात, अशा काही गोष्टी जोशी सरांनी स्वत: अभ्यासल्या आहेत हे विशेष.

सर आपल्या कलेविषयी बोलताना सांगतात की, ''सुरुवातीला दिसतं तसं पेंटिंग करत गेलो. रिॲलिस्टिक पेंटिंग म्हणतात, तेच करायचो. पण मग हळूहळू लक्षात आलं की, जे दिसतं त्याच्या पलीकडे जायला हवं. तो माझा एक वेगळा प्रवास